# नाशिक महानगरपालिका, नाशिक.

Rajeev Gandhi Bhavan, Sharanpur Road, (Post Box no.12), Nashik-422 002.

Visit us at : www.nmc.gov.in E-mail: dmc_llc@nmc.gov.in ph.no. 0253-2222476

जा. क्र.जापवि/कक्ष-१/ ३८० /२०२०
दिनांक :१० /०६ /२०२०
NMC/DTD/OWL/२०२०/

**विषय:-** राज्यात कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत निर्बंध सुकर करणे तसेच टप्प्याटप्प्याने टाळेबंदी उघडणेबाबत (Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown.)

**संदर्भ** :- १. मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र यांचे कडील महसूल व वन , आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन अधिसूचना क्रमांक डीएमयु/२०२०/सीआर/९२/डीआयएसएम-१ दि.०५ मे, २०२०

२.मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र यांचे कडील महसूल व वन , आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन अधिसूचना क्रमांक डीआयएसएम-१ दिनांक ३१/०५/२०२०, डीआयएसएम-१ दिनांक ०४/०६/२०२०

३. इकडील कार्यालयाकडील जा. क्र. जापवि/कक्ष-१/३६७/२०२० दिनांक ०४/०६/२०२० अन्वयेचा आदेश.

४. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांचे आदेशाचे पत्र- क्र. कक्ष/ कोरोना विषाणू/३१३/२०२० दिनांक ०५/०६/२०२०

---

**सुधारीत आदेश :-**

**संदर्भ क्रमांक १,२ व ४ नुसार संदर्भ क्रमांक ३ चे आदेशात खालील प्रमाणे सुधारणा करणेत येत आहे.**

राज्य शासनाने आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DMU-१ दि.३१ मे, २०२० अन्वये कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत निर्बंध सुकर करणे तसेच टप्प्याटप्प्याने टाळेबंदी उघडणेबाबत (Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown.) आदेश पारीत केलेला आहे.

संदर्भिय क्र. १ मधील दिनांक ०४/०६/२०२० रोजीच्या आदेशान्वये सुधारीत दिशानिर्देशांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा व समावेश करण्याचे आदेश जारी केलेले आहेत.

**मिशन बिगिन अगेन फेज I** अंतर्गत पोटकलम (i) मैदानी शारीरिक क्रियाकलाप (उद्याने व जॉगिंग ट्रॅक) मध्ये अट क्र.६ नंतर पुढील अटीचा समावेश करणेत येत आहे.

१. कोणतेही उपकरणे/ उद्यान उपकरणे/ खुल्या जागेतील व्यायामशाळा / खेळाचे साहित्य जसे स्विंग/ बार्स इत्यादी हाताळणेस प्रतिबंध राहील.

२. तसेच, **मिशन बिगिन अगेन फेज II** अंतर्गत पुढील बाबीचा समावेश करणेत येत आहे.

रोड/ लेन / पॅसेजच्या एका बाजूला असलेली सर्व दुकाने एका दिवशी आणि दूसऱ्या दिवशी रस्त्याच्या दुसऱ्या बाजूची सर्व दुकाने पूर्ण कामकाजाच्या कालावधीसाठी उघडतील / खुली राहतील.

वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची व त्यास व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देणेची जबाबदारी सर्व संबंधितांची जबाबदारी राहील. आदेशाचे उल्लंघन करणारे सर्व बाजारपेठा, बाजारपेठ परीसर आणि दुकान, संस्था किंवा व्यक्ती कठोर कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश मनपा संकेतस्थळ www.nmc.gov.in वर प्रसिध्द करणेत आलेला आहे.

10.06.2020

(राधाकृष्ण गमे)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत माहितीसाठी / उचित कार्यवाहीस्तव :**

अ) जिल्हाधिकारी, नाशिक तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नाशिक
आ) पोलीस आयुक्त,नाशिक शहर
इ) मा. महापौर, मा. उपमहापौर, नाशिक महानगरपालिका,नाशिक
ई) मा. सभागृह नेता / मा. विरोधी पक्षनेता / मा. सर्व पक्षीय गटनेते , नाशिक महानगरपालिका, नाशिक
उ) मा. सभापती, (सर्व समित्यांचे ) नाशिक महानगरपालिका,नाशिक

**प्रत कार्यवाहीसाठी :**

१. सर्व विभागीय अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक
२. सुरक्षा अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक
३. सर्व विभागप्रमुख, नाशिक महानगरपालिका, नाशिक
४. जनसंपर्क अधिकारी, नाशिक महानगरपालिका , नाशिक

Scanned by CamScanner